# सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय

२रा मजला, नवीन मध्यवर्ती,पुणे-४११००१

दुरध्वनी क्र. ०२०-२६१२२८४६/४७ comm.urban@gmail.com

**सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी किंवा पदाधिकाऱ्यांविरुध्द वैयक्तिक नात्याने दाखल केलेल्या किंवा करण्यात आलेल्या विवक्षित कार्यवाहीसाठी संस्थेच्या निधीचा वापर न करणेबाबत.**

जा.क्र.४ सआ/कायदा व वैधा.कार्य./कलम ८८/चौकशी /सुनावणी खर्च / ९३ /२०२२ दिनांक 22 /०३/२०२२

## परिपत्रक

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये निबंधकाला स्वत: होवुन संस्थेची रचना , तिचे कामकाज आणि तिची आर्थिक स्थिती याबद्दल चौकशी करता येते. तसेच कलम ८८ अन्वये एखाद्या संस्थेची कलम ८१ अन्वये लेखापरीक्षा किंवा कलम ८३ अन्वये चौकशी किंवा कलम ८४ अन्वये निरीक्षण चालु असताना किंवा त्या संस्थेचे समापन होत असताना किंवा अशा लेखापरीक्षेच्या , चौकशीच्या , निरीक्षणाच्या किंवा समापनच्या परिणामी लेखापरीक्षकाने किंवा कलम ८३ अन्वये चौकशी करण्यास प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने किंवा कलम ८४ अन्वये पुस्तकांचे निरीक्षण करण्यास प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने किंवा कलम १०५ अन्वये परिसमापकाने दिलेल्या अहवालाच्या आधारे किंवा अन्यथा , संस्थेच्या रचनेत किंवा व्यवस्थापनात जिने कोणताही भाग घेतला होता , अशा कोणत्याही मृत किंवा माजी किंवा विद्यमान अधिकाऱ्याने पाच वर्षांच्या कालावधीत संस्थेच्या कोणत्याही पैशांचे किंवा मालमत्तेचे अपयोजन केले आहे किंवा त्याने असा पैसा किंवा मालमत्ता ठेवुन घेतली आहे किंवा त्याच्या संबंधात, तो उत्तरदायी किंवा जबाबदार झाला आहे , किंवा संस्थेच्या बाबतीत कोणतेही अपकार्य किंवा विश्वासघात केल्याबद्दल तो दोषी झाला आहे या बद्दल निबंधकाची खात्री होईल तर, निबंधकास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस अशा व्यक्तीविरुध्द किंवा व्यक्तींविरुध्द आरोप ठेवता येईल आणि संबंधित व्यक्तीस आणि मृत व्यक्तीच्या बाबतीत तिची मालमत्ता ज्याला वारसाने मिळाली असेल, अशा तिच्या प्रतिनिधीस आरोपाबाबत उत्तर देण्याची वाजवी संधी दिल्यानंतर , निबंधक किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती या कलमानुसार ठरवील त्या दराने जे व्याज होईल त्या व्याजासह , तो पैसा किंवा ती मालमत्ता किंवा त्या पैशाचा किंवा मालमत्तेचा भाग, याची परतफेड करण्यास किंवा तो परत करण्यास किंवा असे अपयोजन केल्याबद्दल, ठेवुन घेतल्याबद्दल , अपकार्याबद्दल, किंवा विश्वासघात केल्याबद्दल भरपाई म्हणुन निबंधक किंवा अशी व्यक्ती ठरवील , ती रक्कम संस्थेच्या मत्तेत भरण्याविषयी आदेश देता येईल अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७१ अ मधील तरतुदीनुसार कलम ७८ , ७८अ किंवा ९६ अन्वये संस्थेच्या कोणत्याही पदाधिकाऱ्याने किंवा पदाधिकाऱ्याविरुध्द वैयक्तिक नात्याने दाखल केलेल्या किंवा करण्यात आलेल्या कोणत्याही कार्यवाहीचा खर्च भागवण्याच्या प्रयोजनार्थ, संस्थेच्या निधीतुन कोणताही खर्च करता येणार नाही अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८अन्वये सुरु असलेल्या चौकशी प्रकरणांमध्ये संबंधित सहकारी संस्थांचे समिती सदस्य / कर्मचारी /अधिकारी / पदाधिकारी यांचा सहभाग असतो. कलम ८८ च्या काही चौकशीच्या प्रकरणांमध्ये असे निदर्शनास आले आहे की, सहकारी संस्थांचे समिती सदस्य / कर्मचारी /अधिकारी / पदाधिकारी हे चौकशीच्या सुनावणीचा खर्च हा संस्थेच्या निधीतुन करीत आहेत. कलम ८८ खालील चौकशी ही संबंधितांची वैयक्तिक नात्याने चौकशी केली जात असल्याने सहकारी संस्थेच्या निधीचा विनियोग खाजगी कारणांसाठी करणे संस्थेच्या आर्थिक हितास बाधा आणणारे कृत्य आहे. वास्तविक कलम ८८ अन्वये आदेशित केलेली रक्कम हि संस्थेच्या नुकसान भरपाईसाठीच असते आणि कलम ८८ खालील चौकशीमध्ये सुनावणीच्यावेळी संस्थेचा निधी वापरल्याने संस्थेचे आर्थिक हित जपले जाणार नाही.परिणामी सहकारी संस्था आर्थिकदृष्टया अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यास्तव हया परित्रकान्वये निर्देशीत करण्यात येते की, कलम ८८ खालील सुनावणीवेळी किंवा चौकशीच्या अनुषंगाने सल्लागार फी , वकील फी तसेच पुनरिक्षण अर्ज अथवा न्यायालय यांमध्ये येणारा खर्च हा संबंधित अपचारी व्यक्तींनी संस्थेच्या निधीतुन न करता स्वत: वैयक्तिकरित्या करावा. अशा प्रकारे अपचारी व्यक्तींनी संस्थेच्या निधीतुन खर्च केला असल्याबाबत संबंधित लेखापरीक्षक यांनी काटेकोरपणे तपासणी करावी. तसेच सदर अपचारी व्यक्तींनी संस्थेच्या निधीमधुन खर्च केलेली रक्कम वसुलपात्र असल्याबाबत सर्व संबंधिताना कळविण्यात यावे. सदरच्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे सर्व संबंधितांना बंधनकार आहे याची नोंद घ्यावी.

(अनिल कवडे)
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रति,**

१. विभागीय सहनिबंधक , सहकारी संस्था (प्रशासन) / (लेखापरिक्षण) (सर्व)------------------------

२. जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था (सर्व)-----------------------------------

त्यांना कळविण्यात येते की, वरील प्रमाणे परिपत्रकीय सूचना आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व संबंधीत अधिनस्त कार्यालयांचे निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

३. जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, वर्ग १ (सर्व)

**प्रत माहीतीस्तव :-**

१. मा. अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ ( सविनय )

२.अपर निबंधक, सहकारी संस्था , महाराष्ट्र राज्य, पुणे (सर्व )